● सोमवार, दि. १० फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १९२ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## बांगलादेशी घुसखोर हद्दपारीसाठी पुण्यात हिंदू संघटनांचा विराट मोर्चा !

# शेवटचा बांगलादेशी भारताबाहेर जाईपर्यंत आंदोलन चालू राहणार !

**पुणे । प्रतिनिधी** - देशाच्या सुरक्षेसाठी प्रत्येक बांगलादेशी घुसखोर देशातून हद्दपार करा, बांगलादेशी घुसखोरांना आश्रय देणार्यांवर देशद्रोहाचे गुन्हे दाखल करा. संशयीत ठिकाणी कोंबिंग ऑपरेशन राबवून, बांगलादेशी घुसखोरांना शोधून काढा. पोलिसांना पूर्णपणे मोकळीक द्या, ते संपूर्ण देश बांगलादेशी घुसखोरमुक्त करतील. जोपर्यंत शेवटच्या बांगलादेशी घुसखोरावर कारवाई होऊन तो भारताच्या बाहेर जात नाही तोपर्यंत हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे आंदोलन चालू राहणार आहे, असे परखड प्रतिपादन हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे राष्ट्रीय संघटक श्री. सुनील घनवट यांनी 'बांगलादेशी घुसखोरांच्या विरोधातील मोर्चा'त केले.

केंद्र आणि सर्व राज्य सरकारांनी देशभरात 'बांगलादेशी घुसखोर शोध मोहिम' राबवून सर्व बांगलादेशी घुसखोरांना शोधून काढावे, त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि त्यांना देशाबाहेर हाकलावे, यासाठी हिंदु राष्ट्र समन्वय समितीच्या वतीने ग्रामदैवत कसबा गणपती मंदिर ते जिल्हाधिकारी कार्यालय या ठिकाणी भव्य पायी मोर्चा काढण्यात आला. मोर्चाच्या समाप्तीनंतर हिंदु राष्ट्र समन्वय समितीच्या वतीने पुण्याच्या निवासी जिल्हाधिकार्यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात देशभरात 'बांगलादेशी घुसखोर शोध मोहिम' राबवून त्यांना हद्दपार करण्याची मागणी करण्यात आली.

'राष्ट्र की रक्षा हम करेंगे, राष्ट्ररक्षक कहलायेंगे। भगवा थामे संकल्प लिया है, हर बांगलादेशी घुसपेठीया भगायेंगे !' असा संकल्पही या मोर्चात करण्यात आला. या मोर्चामध्ये भाजपा, योग वेदांत समिती, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदु परिषद, वंदे मातरम संघटना, शिवसेना, बजरंग दल, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, श्री स्वामी समर्थ मंदिर दिंडोरी प्रणित, महाराष्ट्र मंदिर महासंघ, हिंदु जनजागृती समिती, रणरागिणी शाखा, वारकरी संप्रदाय, श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, समस्त हिंदू आघाडी, पतीत पावन संघटना, स्वा. सावरकर स्मृती प्रतिष्ठान, राष्ट्र प्रथम प्रतिष्ठान, जय शंकर प्रतिष्ठान, सनातन संस्था आदी संघटनांसह हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे, हिंदु जनजागृती समितीचे पुणे जिल्हा समन्वयक श्री पराग गोखले, भाजपच्या रणरागिणी शाखेच्या उज्ज्वला गौड, तसेच मोठ्या संख्येने हिंदुत्ववादी सहभागी झाले होते.

या वेळी बोलतांना श्री. घनवट पुढे म्हणाले की , देशभरात अनेक राज्यांत बांगलादेशी घुसखोरांचा अक्षरशः सुळसुळाट झाला आहे. यातून राज्याच्या सुरक्षेला मोठा गंभीर धोका निर्माण झाला असून सामाजिक अस्थिरता, गुन्हेगारी वाढ, रोजगाराची समस्या, तसेच खोट्या कागदपत्रांवर वास्तव्य करणार्यांचे मोठे रॅकेट




राज्यात सक्रिय असल्याचे दिसून येते. अमेरिका आणि युरोपमधील अनेक देशांनी अनधिकृत स्थलांतरितांविरोधात कठोर धोरण अवलंबले आहे. भारतानेही तातडीने अशी कठोर कारवाई करायला हवी. तसेच प्रत्येक नागरिकाने सतर्क राहून घुसखोरांविरोधात आवाज उठवला पाहिजे. जनतेने एकमुखाने मागणी केल्यास सरकारला बांगलादेशी घुसखोरांच्या समस्येकडे लक्ष देणे भागच पडेल हे निश्चित !

हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे म्हणाले की, डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आल्यानंतर त्यांनी अमेरिकेमधून अनाधिकृत लोकांना बाहेर काढायला सुरुवात केली. त्याप्रमाणेच भारतातूनही सर्व बांगलादेशी घुसखोरांना बाहेर घालवले पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पहिल्या टर्मच्या वेळेला १६ मे या दिवशी सर्व बांगलादेशींनी आपली बॅग बांधून तयार राहावे असे सांगितले होते. तर आता अशा कोणत्या १६ मे ची वाट बघायला पाहिजे ? वर्ष २०२५ चा १६ मे हा अखेरचा ठरला पाहिजे.

## जालन्याच्या श्रेयश बटुले याची महाराष्ट्राच्या १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघात निवड

**जालना । प्रतिनिधी** - जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालना तसेच साई काणे क्रिकेट अॅकॅडमी चा क्रिकेटपटू व तेज तर्रार गोलंदाज श्रेयस बटुले याची महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या १४ वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड करण्यात आली आहे.



जिल्हा क्रिकेट असोशिएशन जालनाच्या संघाकडून खेळत असताना ऋषिकेश काणे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रेयस बटूले याने भन्नाट गोलंदाजी करून खेळातील विशेषता गोलंदाजीतील कामगिरीच्या जोरावर महाराष्ट्राच्या क्रिकेट संघात स्थान मिळवले आहे. या यशाबद्दल महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे पान २ वर

युवा आदर्श

### अवेक्षण ...

कारभार असा असो
ठरावे खरे आकर्षण
विरोधक सोबत हवे
कमीत कमी रे घर्षण
कुणाचे कुठले दुखणे
उपचार करे अवेक्षण
कृत कारभार मध्येचं
सूक्ष्म व्हावे निरीक्षण
बदल वेळी आवश्यक
करुच कार्य परिक्षण
सत्ता असे तप:सिद्धी
जनाधार हे अनवेक्षण
कधी करता परिपूर्ण
वाटपाहतेयं आरक्षण
कायद्याच्या चौकटीस
कोर्टही देईल संरक्षण
सुयोग्य अमृत शिंपण
शुक्राचार्य करे भक्षण
काळा बाजार कराया
मिळते फुकट शिक्षण
ठिणगी कुठे सदृशता
विझवा वणवा तक्षण
उदृयुक्त प्रवेशा रावण
करु पाहतात औक्षण

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

## सोयाबीन खरेदीची मुदत वाढविण्याची मागणी

**बीड** - सरकारी सोयाबीन खरेदीची मुदत संपली आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. कारण अद्याप अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी बाकी होती. मात्र, त्यापूर्वीच सरकारी खरेदी बंद केली आहे. याच मुद्यावरुन किसान सभा आक्रमक झली आहे. सरकारने खरेदी केंद्राची मुदत वाढवून पुन्हा सोयाबीन खरेदी सुरू करावी, अन्यथा किसान सभा राज्यभर आंदोलन छेडणार असल्याचा इशारा किसान सभेचे नेते डॉ. अजित नवले यांनी दिला. तसेच मुदतवाढ न दिल्यास कृषी मंत्र्यांच्या दारात सोयाबीन ओतणार असल्याचेही नवले म्हणाले.

सोयाबीन खरेदी बंद केल्याने अनेक शेतकरी वंचित आहेत. लाखो शेतकऱ्यांचे सोयाबीन पडून पान २ वर

जेईएस महाविद्यालयांमध्ये युवा जल्लोष...

# युवा जल्लोषमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो - पाटोदकर

**जालना । प्रतिनिधी** - युवा जल्लोषमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत असून जीवनात मिळालेली ही सुवर्ण संधी आहे, युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा. या सहभागामुळेच मी नाट्य व सिनेक्षेत्रात नावलौकिक कमवू शकलो, असे प्रतिपादन मराठी नाट्य व सिने अभिनेते श्री राजू पाटोदकर यांनी जालनाच्या जेईएस महाविद्यालयाच्या 'युवा जल्लोष' महोत्सवात पारितोषिक वितरण कार्यक्रमात केले.

जेईएस महाविद्यालय जालना येथे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, यासाठी दरवर्षाप्रमाणे यावर्षीही 'युवा जल्लोष-२०२५' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी क्रीडा, सांस्कृतिक, शैक्षणिक व युवक महोत्सवात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या गुणवंत व यशवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मराठी नाट्य व सिने अभिनेते श्री राजू पाटोदकर हे होते, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. हेमंत वर्मा, युवा जल्लोष कार्यक्रमाचे प्रमुख डॉ.गणेश कुलकर्णी, विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष तन्मय अग्निहोत्री, विद्यार्थी प्रतिनिधी कु. तेजस्विनी राऊत आदींची उपस्थिती होती.



यावेळी विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष तन्मय अग्निहोत्री यांनी आपले मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांसाठी आधुनिक सोयी-सुविधा पुरवून, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल, व गुणवत्ता वाढीकरता ,वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करावे, असेही तन्मय अग्निहोत्री यांनी सांगितले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मराठी नाट्य व सिने अभिनेते श्री राजू पाटोदकर म्हणाले की, आजची पिढी खूप फास्ट असून तुमच्याकडे शिकण्यासारखे खूप काही आहे. तुमचं करिअर उत्तम व्हावं म्हणून महाविद्यालयामध्ये स्नेहसंमेलनचे आयोजन केले जाते. यामधूनच विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळतो. विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्णसंधी आहे, यामधूनच मोठमोठे कलावंत व व्यक्ती घडत असतात.शिक्षण पद्धतीमध्ये विद्यार्थी -शिक्षक दोघे घटक महत्त्वाचे आहेत, नाट्य व सिनेमा हे क्षेत्र शुद्ध असून यामध्ये युवकांनी सहभागी व्हावे , कलावंत म्हणून नावलौकिक कमवावा, असेही श्री पाटोदकर यांनी सांगितले.

श्री राजू पाटोदकर यांनी नाटक व सिनेमा पटकथा लिहिल्या आहेत, त्यांनी दिग्दर्शनही केलेले आहे, टीव्हीवरील वेगवेगळ्या मालिकेतही त्यांनी काम केलेले आहे, महाराष्ट्रातील ते एक अष्टपैलू व्यक्तिमत्व असून त्यांनी 'आमदार सौभाग्यवती 'नाटकाचा पान २ वर

# जिल्ह्यात कोर्ट फी तिकीट व स्टॅम्प दोन दिवसात उपलब्ध होणार - आ. खोतकर

## नागरिक आणि विधिज्ञांना मोठा दिलासा- अॅड. महेश धन्नावत

**जालना । प्रतिनिधी** - नोव्हेंबर महिन्यापासून जालना जिल्ह्यात ५ रुपयाचे कोर्ट फी तिकीट आणि ५०० रुपयाचे स्टॅम्प उपलब्ध नसल्याने विधिज्ञांना आर्थिक उदंड सोसावा लागत आहे. याबाबत मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊनही तुटवडा दूर होत नसल्याने अॅड. महेश धन्नावत यांनी रविवार (दि. ९) रोजी आ. अर्जुनराव खोतकर यांची भेट घेऊन, ही बाब निदर्शनास आणून दिली. आ. खोतकर यांनी तात्काळ जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांच्याशी संपर्क साधला असता, सकारात्मक प्रतिसाद देत येत्या दोन दिवसात कोर्ट फी तिकीट आणि स्टॅम्प उपलब्ध करून दिले जातील, असे डॉ. पांचाळ यांनी सांगितले.

या संदर्भात अॅड. धन्नावत यांनी सकाळी ९ वाजता आ. खोतकर यांची भेट घेऊन निवेदन दिले. यावेळी ते म्हणाले की, जिल्ह्यात नोव्हेंबर महिन्यांपासून ५ रुपयाचे कोर्ट फी तिकीट उपलब्ध नाहीत. त्यामुळे ५ ऐवजी १० रुपयाचे तिकीट वापरावे लागत आहेत. परिणामतः विधिज्ञ यांना किमान एक ते दोन हजार रुपयाचा दररोज जास्तीचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. तसेच जिल्ह्यात कुठेच ५०० रुपयांचे स्टॅम्प पेपर उपलब्ध नसल्यामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. कामे खोळंबत आहेत. या समस्याबाबत आपण नोव्हेंबर महिन्यात मुद्रांक जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले असता, त्यांनी कोषागार कार्यालयाला पत्र देऊनदेखील अद्यापपर्यंत पाच रुपयाचे कोर्ट फी तिकीट आणि पाचशे रुपयांचे स्टॅम्प उपलब्ध झालेले नाहीत, यात आपण लक्ष घालावे, अशी विनंती ड. धन्नावत यांनी केली असता, त्यांच्या समक्ष आ. खोतकर यांनी जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांच्याशी मोबाईलवर संपर्क साधून, ही पान २ वर



## इंडिया आघाडी मजबूत; लोकसभेसाठी पुन्हा एकत्र - राजीव शुक्ला

**नवी दिल्ली** - इंडिया आघाडीतील घटकपक्ष आम आदमी पक्ष आणि काँग्रेसने दिल्ली विधानसभा निवडणुका स्वतंत्र लढवल्या. त्यामुळे या दोन्ही पक्षांना पराभवाचा सामना करावा लागला. आम आदमी पक्षाला २२ जागा मिळाल्या असून काँग्रेसला सलग तीन टर्ममध्ये खातंही उघडता आलं नाही. दरम्यान, इंडिया आघाडी मजबूत असून पुन्हा लोकसभा निवडणुकीसाठी आघाडी एकत्र येईल, असा विश्वास काँग्रेस खासदार राजीव शुक्ला यांनी व्यक्त केला आहे.

शुक्ला यांनी स्पष्ट केले की इंडिया आघाडीची स्थापना प्रामुख्याने लोकसभा निवडणुकीसाठी करण्यात आली होती, ज्यामध्ये प्रत्येक पक्षाला राज्यस्तरीय निवडणुकीत स्वतःचे निर्णय घेण्याची परवानगी देण्यात आली होती. जेव्हा इंडिया आघाडीची स्थापना झाली, तेव्हा असे ठरले होते की आम्ही लोकसभा निवडणुका एकत्र लढणार आहोत आणि राज्यांमध्ये पक्ष स्वतःचे निर्णय घेऊ शकतात. जेव्हा संसदीय निवडणुका होतील, तेव्हा इंडिया आघाडीची चर्चा पुन्हा सुरू होईल, असं ते म्हणाले. विरोधी पक्षांमधील एकता अबाधित आहे आणि तशीच राहील, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

दिल्ली निवडणुकीत भाजपाने ४८ जागा जिंकून 'आप'ची दशकभराची सत्ता संपुष्टात आल्यानंतर ते असं म्हणाले. 'आप'ला फक्त २२ जागा मिळाल्या, तर काँग्रेसला सलग तिसऱ्यांदा एकही जागा जिंकता आली नाही. काँग्रेसने 'आप'च्या मतांचे विभाजन केले आणि त्यांच्या पराभवाला हातभार लावला पान २ वर

# संपादकीय

## भ्रष्टाचार मोठी समस्या

भ्रष्टाचार ही जागतिक मोठी समस्या बनली आहे. जगभराच्या पाठीवर कुठेही गेले तरी भ्रष्टाचार हा दिसून येत आहे. भारतात तर भ्रष्टाचार हा शिष्टाचार झाला आहे. भ्रष्टाचार हा देशाला पोखरत आहे. सर्वच राजकीय पक्ष हे भ्रष्टाचारावर बोलतात. भ्रष्टाचार कमी करू असे आश्वासित करतात. देशातील सर्वात मोठा पक्ष भारतीय जनता पक्षाने तर भ्रष्टाचार संपविणार असल्याची जणू भीष्म प्रतिज्ञाच घेतलेलेली आहे. मात्र, भ्रष्टाचार संपणे तर दूर कमी होण्याचे सुद्धा नाव घेत नाही, ही मोठी शोकांतिका आहे. अमेरिकेच्या एका संस्थेच्या सर्व्हेनुसार लाचखोरीमुळे गेल्या सत्तर वर्षात ४५० अब्ज डॉलरचे नुकसान झाले असल्याचे पुढे आले आहे. तसे लाच देणे आणि घेणे दोन्हीही गुन्हा आहे. अनेकदा सरकारी अधिकारी -कर्मचारी लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या हाताशी लागतात. मात्र, पुढे या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे काय होते हे सर्वश्रूत आहे. अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांची घरे, घरे म्हणण्यापेक्षा बंगले, महाल डोळ्याचे पारणे फेडणारी आहेत. अनेकांकडे कोट्यवधींची मालमत्ता अनेकदा आढळून आली आहे. महसुल आणि पोलीस खाते यात अव्वल असल्याचा नेहेमीचाच अनुभव आहे. मात्र, इतर कोणतेही खाते लाचखोरीपासून वाचलेले नाही. या लाच घेणाऱ्या अधिकारी -कर्मचाऱ्यांविरोधात कठोरातील कठोर कारवाई होणे आवश्यक असून त्यासाठी राज्यकर्त्यांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. तर आणि तरच काही प्रमाणात भ्रष्टाचार कमी होण्यास मदत होईल.

# ग्रोव्हिजन गटशेती संघांचे करजगावात रंगले चर्चासत्र



**जालना । प्रतिनिधी** - जिल्ह्यातील ग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेला आयोजिण्यात येणारे फेब्रुवारी महिन्यातील नियमित मासिक चर्चासत्र रविवार (दि. ९ फेब्रु.) रोजी भोकरदन तालुक्यातील मौजे करजगांव (कल्याणी ) येथे अत्यंत उत्साहात पार पडले.

गटशेतीच्या माध्यमातून पीकविलेल्या दर्जेदार मालाचा ब्रँड करून आपल्याला आपल्या मालाची किंमत ठरवून पाहिजे तो भाव पदरात पाडून घेता येतो असे ग्रोव्हिजन गटशेती संघाचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी यावेळी आपल्या अनुभवातून सोदाहरण सांगितले.

रामेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्री. मोतीराम नरवाडे, 'आप' चे श्री. कडुबा बोरसे, वखारीचे श्री. रामप्रसाद खैरे, कुसळीचे श्री. विठ्ठल वैद्य, फुलंब्री तालुक्यातील बाभुळगावचे श्री. रावसाहेब मोरे, वालसाचे डॉ. गणेश पोटे, पळसखेड पिंपळेचे श्री. गणेश पिंपळे, श्री. भरत पिंपळे, श्री. गुलाब पिंपळे, श्री. राजू पिंपळे, बोरगाव जहागीरचे श्री. विष्णू दळवी, जळगाव सपकाळचे श्री. संजय सपकाळ, श्री. दिलीप सपकाळ, पिंपळगाव रेणुकाईचे श्री. घनशाम देशमुख, श्री. समाधान चिलार, श्री. सुभाष नरवाडे, श्री. संदीप गावंडे, हिसोडा खुर्दचे श्री. संतोष साळवे, कल्याणीचे श्री. विजयसिंग खंडाळकर, पळसखेडा मुर्तडचे श्री. किसन सोनुने, शेख हिराजी शेख सुपडू, करजगांवचे श्री. सुनिल लोखंडे, श्री. अमोल बोरसे, श्री. शेख साबेर, श्री. रविंद्र बोरसे, श्री. गणेश गावंडे यांनी शेती संदर्भातील आपले अनुभव कथन केले. शेतीमध्ये मेहनतीपेक्षा ज्ञानाला जास्त महत्व असून शेतकऱ्यांना आता स्मार्ट शेतीकडे वळावे लागेल. विचाराची देवाण घेवाण करण्यासाठी शेतकऱ्यांनी तज्ज्ञ शेतकरी, शास्त्रज्ञ यांच्या संपर्कात राहून शेतीविकास घडवण्याची गरज यावेळी या सर्वांच्या बोलण्यातून व्यक्त करण्यात आली.

सुरुवातीला आयोजक श्री. संतोष बोरसे यांच्या संयुक्त अशा शून्य मशागत शेतीवर शिवारफेरी करण्यात आली. श्री. संतोष बोरसे यांनी उपस्थितांचे आभार मानले. वन भोजनाने चर्चासत्राची सांगता झाली.

# पोलिस अधीक्षक यांच्या कडून परतूर पोलिसांचा प्रशस्ती पत्र देऊन गौरव



**परतूर । प्रतिनिधी** - परतूर पोलिसांची मागील काळात कामगिरी पाहता सिल्लोड येथून परभणी येथे कत्तली साठी घेऊन जाणारे ४७ गोवंश जनावरे पकडून त्यांचे प्राण वाचवले, एकूण ३७ लाख रुपये किंमती चा मुद्देमाल जप्त करून आरोपी विरुद्ध कारवाई केली होती,

तसेच सोलार टाटा प्लांट परतूर येथील केबल ची चोरी करणारी टोळी ला पकडून त्यांना अटक करून ६ गुन्हे उघकीस आणून आरोपी विरुद्ध गुन्हे दाखल करून कारवाई केली होती,

तसेच परतूर शरात विनापरवाना अवैध रित्या घरगुती वापराचा गॅस स्वतः चे फायद्या साठी ऑटो रिक्षा मध्ये भरून विकताना मिळून आल्याने त्यांना रंगे हाथ पकडून गुन्हा दाखल करून कारवाई केली होती,

परतूर पोलिसानी अशी उत्कृष्ट काम गिरी केल्यामुळे दि. ७/२/२५ रोजी गुन्हे आढावा बैठकी मध्ये मा. अजय कुमार बंसल. पोलिस अधीक्षक जालना, मा. आयुष नोपणी. अप्पर पोलिस अधीक्षक, जालना यांनी पोलीस निरीक्षक,एम. टी. सुरवसे.पोलिस स्टेशन परतूर. व पोहेकॉ,आशोक गाढवे.पोकॉ, दीपक आडे.पोकॉ, ज्ञानेश्वर वाघ. पोकॉ,आचूत चव्हाण.चालक, पॉका,स्वप्नील फंड. पोकॉ, आर. एस. पारवे सर्व नेमणूक पोलिस स्टेशन परतूर यांना प्रशस्ती पत्र देऊन गौरवण्यात आले आहे.यामुळे परतूर पोलिसांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

# डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात




**परतूर । प्रतिनिधी** - परतुर तालुक्यातील वाटूर फाटा येथील डॉल्फिन इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास सुरुवात विज्ञेची देवी सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. व यानंतर शाळेतील चिमुकल्यानी आपले कलाविष्कार सादर केले. यामध्ये देशभक्तीपर गीत, बालगीत, लावणी सादर करण्यात आली. व संत चोखामेळा हे नाटक विद्यार्थ्यांनी सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. यावेळी आपल्या चिमुकल्याचा उत्साह वाढवण्यासाठी मोठ्या प्रमाणात पालकांनी गर्दी केली होती. कार्यक्रमाची रूपरेषा श्रीमती पाटील भाग्यश्री यांनी मांडली. तर आभार प्रदर्शन शेळके गजानन यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्रीमती कुकडे विद्या . सय्यद नसरीन. पाटिल भाग्यश्री. काळे साधना . उबाळे वंदना . सनईकर त्रिवेणी. शेळके गजानन इत्यादीनी मेहनत घेतली.

# कारागृह पोलीस भरतीत प्रदीप काळे यांची निवड



**जालना । प्रतिनिधी** - ते म्हणतात ना जीवन जगतांना जीवनात अनेक अडचणी येतात, मात्र त्या अडी-अडचणीवर मात करीत जिद्द चिकाटी आणि परिश्रम करण्याची तयारी असल्यास शिखर गाठता येते याचे ताजे उदाहरण म्हणजे जालना तालुक्यातील नंदापूर येथील युवक प्रदीप रामदास काळे हे होय.

घरात नेहमी गरीबी, वडील दोन्ही डोळ्यांनी अंध, आई पायाने अपंग असल्याने आपल्याला काम करून घर चालवून आई-वडीलांना सांभाळायचे आहे. परंतू हे सर्व करीत असतांना आपल्या जीवनात काही तरी करून दाखवायची जिद्द प्रदीप काळे या युवकाने मनी बाळगत पोलीस भरती होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात साकार केले आहे, नंदापूर गावातच मिळेल ते काम करून आपले स्वप्न पुर्ण करीत मुंबई कारागृह पोलीस भरतीत त्याने मजल मारली आहे. याकामी त्याला त्याचा भाऊ संदीप काळे यांची मोलाची साथ मिळाली आहे.

मुंबई कारागृह पोलीस भरतीत निवड झाल्याचे समजताच गावात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी सरपंच दत्तु कुरधने, तंटामुक्ती अध्यक्ष उत्तम खरात, रामकिसन खरात, एमपीडब्ल्यु श्री नागरे, लिंबाजी शिंदे, जनार्धन काळे, वैभव वानखेडे, सुरेश बार्डे, संजय काळे जनार्धन काळे यांच्यासह अनेकांनी प्रदीप व त्याचे आई-वडील व भाऊ यांचा सत्कार करून पेढे भरवून शुभेच्छा दिल्या. तर सायंकाळी गावकर्यांनी डिजे लावून संपुर्ण गावातून मिरवणुक काढत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

### शहरातील स्ट्रीट लाईटचे कामे निकृष्ट दर्जाचे झाल्याचा सामाजिक कार्यकर्त्याचा आरोप

# लवकरच मनपा विरोधात हायकोर्टात पिटीशन दाखल करणार - साद बिन मुबारक

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील स्वच्छता व स्ट्रीटलाईटचे कामे निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांनी केलाय. गेल्या दोन वर्षात अनेक वेळा विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी , महानगरपालिका यांना निवेदन देऊनही उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. मात्र कुठलीच ठोस कारवाई अजून करण्यात आली नाहीये. एखाद्या मंत्र्याचा दौरा असला तर त्वरीत थातूर मातूर स्वच्छता केली जाते तसेच स्ट्रीट लाईट चालू केल्या जाते त्यानंतर मात्र पुन्हा जैसे थे परिस्थिती होत आहे.औरंगाबाद चौफुली पासून ते अंबड चौफुली पर्यंत अनेक महत्वाची ठिकाणी आहेत, कोट्यावधी रु. खर्चून स्ट्रीट लाईट बसवले मात्र मागील कित्येक महिन्यापासून लाईट बंद आहेत ते त्वरीत चालू करण्यात यावेत.

आज दि.०८ शनिवार रोजी दुपारी एक वा. च्या सुमारास माध्यमांशी संवाद साधाताना साद बिन मुबारक चाऊस म्हणाले की, लवकरच मनपा विरोधात हाय कोर्टात रीट पिटीशन दाखल करणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते साद बिन मुबारक यांनी दिली.



कोरोना काळात नगरपालिकेच्या वतीने मोठा भ्रष्टाचार आपण उघडकीस आणला होता. परंतु मुख्याधिकारी यांनी थातूरमातूर कारवाई करत एका लिपिकावर कारवाई करून प्रकरण मिटवण्याचा प्रयत्न केला. या भ्रष्टाचार प्रकरणात तात्कालीन मुख्याधिकारी पासून ते अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांवर कडक कारवाई झाली पाहिजे अशी मागणी साद बीन चाऊस यांनी केली आहे.

## वाचकांचे मनोगत

महाराष्ट्रात तीन पक्षाचे सरकार म्हणजे महायुती सरकार आहे. नुकत्याच पालक मंत्र्यांच्या नेमणूका झाल्या त्या वादातीत ठरल्या आहेत.आत,संपर्क मंत्री म्हणून नवीन संकल्पना अमलात आली.त्याही नेमणूका झाल्या.तीन पक्षाचे सरकार असल्याने प्रत्येक पक्षाला सरकार मध्ये आपल्या पक्षाचा सहभाग अधिक असावा असे वाटणे स्वाभाविक आहे.पालक मंत्री - संपर्क मंत्री संघर्ष वाढवणार की आपल्या जिल्ह्याला विकासाच्या वाटेवर नेणार हे फक्त त्यांच्या नेत्यांच्या मर्जीवर ठरणार आहे. उदाहरणार्थ ठाणे जिल्ह्याचे पालक मंत्री शिवसेनेचे एकनाथ शिंदे तर संपर्क मंत्री भाजपचे गणेश नाईक आहेत. ते पालघर जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत. त्यांनी पालघर, ठाणे,नवी मुंबई येथे जनता दरबार घेणार असे जाहीर केले आहे.त्यांचे वास्तव्य नवी मुंबईत आहे. ठाणे,पालघर येथील सरकारी पदे आहेत त्यामुळेच ते आपल्या अधिकारात जनता दरबार घेणार. ठाणे आणि पालघर दोन्ही जिल्हे विकासाच्या द्रुष्टीने प्रगतिपथावर येत आहेत. त्यामुळेच विकासकामे करताना श्रेयवादाचा प्रश्न उद्भवणार हे लक्षात घेऊन सरकार मधील पक्षांचे डावपेच सुरू आहेत. अशा घटना प्रत्येक जिल्ह्यात उद्भवणार आहेत तेव्हा श्रेयवादात कोणता पक्ष वरचढ ठरणार हे फक्त मतदारांनी पाहावे.

महादेव गोळवसकर,
कुर्ला मुंबई
९८६९४७६२०९, mahadeogolvaskargmail.com

## पान १ वरुन

### जालन्याच्या श्रेयस ...

अध्यक्ष आमदार रोहित पवार, एमसीएसीचे चेअरमन सचिन मुळे, एमसीएचे जॉइंट सेक्रेटरी संतोष बोबडे, अपेक्स कौन्सिल मेंबर व टूर्नामेंट कमिटीचे चेअरमन राजु काणे, जिल्हा क्रिकेट असोसिएशन जालनाचे अध्यक्ष ॲड. नरेंद्र देशपांडे, उपाध्यक्ष दिलीप शाह, रमेश मगरे, जॉइंट सेक्रेटरी अभिजीत चव्हाण, संतोष भारोटे, रमेश मांटे व साई काणे क्रिकेट अकॅडमीचे सर्व खेळाडू यांनी श्रेयस याचे अभिनंदन करून त्यास पुढील वाटचालीबद्दल शुभेच्छा दिल्या.

### सोयाबीन खरेदीची ...

आहे. खरेदी केंद्राबाहेर अजूनही शेतकऱ्यांच्या रांगा असल्याचे अजित नवले म्हणाले. सोयाबीन खरेदी बंद झाल्याने अनेक शेतकरी हवालदिल झाले आहेत. त्यामुळं सरकारने खरेदी केंद्राची मुदत वाढवून पुन्हा सोयाबीन खरेदी सुरु करावी अशी मागणी अजित नवलेंनी केली आहे. अन्यथा किसान सभा राज्यभर आंदोलन छेडणार असून, कृषीमंत्र्यांच्या घरावर सोयाबीन ओतणार असल्याचा इशारा डॉ. अजित नवले यांनी सरकारला दिला.

बीड जिल्ह्यात नाफडेच्या सोयाबीन खरेदी केंद्राबाहेर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. अनेक सोयाबीन उत्पादक शेतकरी सोयाबीन विक्रीसाठी दिवस-रात्र सोयाबीन केंद्राबाहेर ठाण मांडून आहेत. मात्र, अद्याप या सोयाबीनची विक्री झालेली नाही. ६ फेब्रुवारीपर्यंत सोयाबीन खरेदीची मुदत होती. मात्र, ती संपल्यानं पुन्हा मुदतवाढ द्यावी अशी मागणी शेतकरी करत आहेत.

### युवा जल्लोषमुळे ...

किस्सा सांगितला व नाट्य क्षेत्राचा जीवनात कसा फायदा होतो हे रहस्य उपस्थितीना उलगडून सांगितले. जवळपास ३५ वर्षापासून मी या क्षेत्रात कलावंत म्हणून काम करीत असल्याचेही श्री. पाटोदकरांनी सांगितले.

यावेळी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की, मराठवाड्यातील युवकांनी कूस बदललेली असून, देशात सर्व क्षेत्रात आपला झेंडा रोवला आहे, श्री.राजू पाटोदकर हे सुद्धा मराठवाड्यातले मूळचे आहेत, आज नाट्य व सिने क्षेत्रात मराठवाड्यातील अनेक कलावंत आहेत. जेईएस महाविद्यालयाने सामाजिक, राजकीय ,आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात अनेक व्यक्तीना घडवलेले आहे, मराठवाड्यात ज्ञानदान क्षेत्रात जेईएस महाविद्यालय उत्तम कार्य करत असून, यापुढे करत राहील, असे सांगून,महाविद्यालयाचा वार्षिक अहवालाचे त्यांनी वाचन केले. आम्ही अष्टपैलू व आदर्श नागरिक घडवण्याचे काम करत असल्याचेही प्राचार्य डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.

या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुणवंत व यशवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी विद्यार्थी- विद्यार्थिनी,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिचय प्रा. डॉ. यशवंत सोनुने यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन युवा जल्लोषचे प्रमुख प्रा. डॉ.गणेश कुलकर्णी यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रा. खंडागळे यांनी मानलेत.

### जिल्ह्यात कोर्ट ...

समस्या त्यांच्या कानावर घातली. तिकिटे आणि स्टॅम्प तात्काळ उपलब्ध करून द्यावेत, मुंबई अथवा नाशिक येथून मागविण्यास वेळ लागत असल्यास परिसरातील जिल्ह्यातून ती उपलब्ध करावीत, असे निर्देश आ. खोतकर यांनी दिले. त्यावर येत्या दोन दिवसात पाच रुपयाचे कोट फी तिकीट आणि पाचशे रुपयाचे स्टॅम्प उपलब्ध करून दिले जातील, असा सकारात्मक प्रतिसाद जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी दिल्याची माहिती ड. धन्नावत यांनी दिली.

आ. अर्जुनरावजी खोतकर यांच्या निर्देशानंतर प्रशासनाने तातडीने कारवाई करून कोर्ट फी तिकीट त्वरित उपलब्ध करण्याचा निर्णय घेतल्याने जिल्ह्यात नोव्हेंबरपासून असलेला ५ च्या कोर्ट फी तिकिटाचा तुटवडा दूर होणार असून, नागरिक आणि विधिज्ञांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे धन्नावत यांनी म्हटले आहे.

### इंडिया आघाडी ...

का, असे विचारले असता, शुक्ला यांनी हा युक्तिवाद फेटाळून लावला आणि म्हटले की मतविभाजन प्रत्येक निवडणुकीत होते. निवडणुकीदरम्यान प्रत्येकाची मते कापली जातात. त्यामुळे निवडणुकीत एका पक्षाने दुसऱ्या पक्षासाठी मते कापली असे म्हणणे अयोग्य आहे, असे ते म्हणाले.

काँग्रेस आणि आप यांनी दिल्लीत लोकसभा निवडणूक एकत्र लढवली. तथापि, दोन्ही पक्षांनी दिल्लीत विधानसभा निवडणुकीत एकटे लढण्याची घोषणा केली, परंतु या निर्णयाचा दोघांनाही फायदा झाला नाही.

# भारतीय जैन संघटनेचे राष्ट्र निर्माणात मोलाचे योगदान - नंदकिशोर साखला

## जिल्हा कार्यकारणीचा शपथविधी सोहळा संपन्न



**जालना । प्रतिनिधी -** नैसर्गिक आपत्ती असो की दुष्काळी परिस्थिती, अशावेळी म दतीच्या बाबतीत भारतीय जैन संघटना सदैव अग्रेसर असते. सरकारसोबत पाणीटंचाई निवारणार्थ तलावातील गाळउपसा, खोलीकरण आदी महत्वपूर्ण उपक्रम राबविले जात आहेत. प्रत्येक कुटुंब आणि कुटुंबातील प्रत्येक सदस्य सक्षम - सुसंस्कृत करण्यावर विशेष भर दिला जात असून, राष्ट्रनिर्माणात संघटनेचे महत्त्वपूर्ण योगदान आहे, असे प्रतिपादन भारतीय जैन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदकुमार साखला यांनी येथे बोलताना केले.

भारतीय जैन संघटनेची विभागीय कार्यकारणी, जालना जिल्हा कार्यकारिणी व महिला कार्यकारिणीच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा शपथविधी सोहळा रविवार दि. ९ फ ेब्रुवारी रोजी गुरु गणेश भवन सभागृहात पार पडला, त्यावेळी अध्यक्षस्थानावरून श्री. साखला बोलत होते. या सोहळ्याचे उद्घाटन प्रदेश उपाध्यक्ष विनयकुमार कोठारी यांच्याहस्ते झाले. व्यासपीठावर स्वागताध्यक्ष तथा विभागीय उपाध्यक्ष विजयराज सुराणा, प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय महामंत्री दिपक चोपडा, प्रदेश अध्यक्ष केतन शाह, प्रदेश सचिव प्रविण पारख, उद्योगपती गौतमचंद श्रीश्रीमाळ, जालना पीपल्स बँकेचे चेअरमन संजयकुमार मुथा, मावळते जिल्हाध्यक्ष दिनेश राका यांची उपस्थिती होती.

नंदकिशोर साखला पुढे म्हणाले की, सामाजिक समस्यांचे आकलन आणि कौटुंबिक प्रश्नावर काम करणारी भारतीय जैन संघटना ही एकमेव सेवाभावी संस्था आहे. कुटुंब संस्था टिकण्यासह विवाह संस्था म जबूत करण्याकडे विशेष लक्ष केंद्रित करण्यात आलेले आहे. संघटना १२ महिन्यात १४ कार्यक्रम घेऊन येत असून, त्यात महिला सक्षमीकरणासह ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थ्यांसाठी बरेच काही आहे. लग्न जम विणे कठीण होऊन बसले असून, लग्न झाल्यानंतर ते टिकविणे हे महाकठीण होत चालले आहे. ही समस्या निवारणासाठी संघटनेने विशेष कार्य हाती घेतल्याचे सांगून, आजवर जालना जिल्हा जैन संघटनेचे कार्य सर्वोत्कृष्ट राहिलेले असून, नूतन अध्यक्ष विजयकुमार जैन आणि म हिला कार्यकारणी सर्वोत्तम कार्य करून, संघटनेला नव्या उंचीवर नेतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी व्यासपीठावरील मान्यवरांनी नूतन कार्यकारणी शुभेच्छा दिल्या.

खुशबू जैन यांच्या मंगलाचरण आणि स्वागतगीताने कार्यक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर भारतीय जैन संघटनेच्या विभागीय कार्यकारणीचे अध्यक्ष धनराज सोळंकी, विभागीय उपाध्यक्ष दिनेश राका आणि विजयराज सुराणा, जालना जिल्हाध्यक्ष विजयकुमार जैन, महिला कार्यकारणीच्या अध्यक्ष सौ. सरिता प्रविणकुमार कुचेरिया व त्यांच्या कार्यकारणीला राष्ट्रीय महामंत्री दीपक चोपडा यांनी शपथ दिली. मावळते अध्यक्ष दिनेश राका यांनी त्यांच्या कार्यकाळात राबवलेल्या उपक्रमाची माहिती देऊन, नूतन अध्यक्ष विजयकुमार जैन यांच्याकडे पदभार सोपविला. यावेळी मनोगत व्यक्त करताना नूतन अध्यक्ष विजयकुमार जैन म्हणाले की, शपथविधी सोहळ्याला राष्ट्रीय अध्यक्षांसह संपूर्ण राज्य कार्यकारिणी उपस्थित असल्याने कार्यकारणीला मोठी ऊर्जा प्राप्त झाली असून, सर्वांच्या सहकार्याने जबाबदारी पार पाडून सर्वो त्कृष्ट कार्य करण्याचा प्रयत्न केला जाईल. कार्यकारणीतील प्रत्येक जण प्रत्यक्ष कामाच्या माध्यमातून आपल्या पदाला न्याय देईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा कार्यकारिणीचे सचिव दीपक मोदी, उपाध्यक्ष रवींद्र संचेती, गौतम श्रीश्रीमाळ, ड. अनिल संचेती, पवन सुराणा, सहसचिव स्वप्निल लव्हाडे, कोषाध्यक्ष श्रीपाल मरलेचा, जनसंपर्क अधिकारी ओम धोका, कार्यकारणी सदस्य विजय बाफना, चैतन्य वायकोस, शुभम पिपाडा, जय कोटेचा, अतुल बिनायकीया, पंडित खुळे, रविराज धोका, कुशल गेल्डा, प्रणय पहाडे, चेतन बोथरा, सिद्धार्थ संचेती, अजय बोरा, कुशल देसरडा, आशिष शाह, योगेश कासलीवाल, हर्षवर्धन सेठिया, नीरज सेठीया, पंकज जैन आदींनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन दीपक मोदी यांनी केले. कार्यक्रमाला सम ाज बांधव उपस्थित होते.

# सहकार बँक कॉलनीत अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथेस शुक्रवारपासून प्रारंभ

**जालना । प्रतिनिधी -** येथील सहकार बँक कॉलनीतील गजानन महाराज मंदिरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प. पू. भगवान म हाराज आनंदगडकर यांच्या कृपाशिर्वादाने अखंड हरिनाम सप्ताह, भागवत कथा व विजय ग्रंथ पारायण सोहळ्यास येत्या शुक्रवारपासून प्रारंभ होत आहे.

यां सप्ताहात शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी रोजी हभप भगवान महाराज सावंत तर शनिवार दि.१५ फेब्रुवारी दिनेश महाराज उंडे (देवाची आळंदी), रविवार दि. १६ फेब्रुवारी रोजी हभप सोनवणे महाराज गुरुजी, सोमवार दि. १७ फेब्रुवारी रोजी राजेद्र महाराज वाघमारे आणि मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी हभप श्रीहरी रसाळ महाराज तर बुधवार दि. १९ फ ेब्रुवारी रोजी हभप प्रा. उध्दव महाराज राऊत (आळंदी), गुरुवार दि. २० फेब्रुवारी रोजी हभप त्रिंबक महाराज दस्तापुरकर यांचे हरिकिर्तन होणार असून शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी रोजी हभप डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. तर याच दिवशी तत्पूर्वी श्री. गजानन महाराज पालखी मिरवणूक (दिंडी) सोहळा होणार आहे.

यानिमित्त भरगच्च धार्मिक कार्यक्रम होणार असून दररोज सकाळी काकडा भजन, विष्णू सहस्त्रनाम, श्री. गजानन विजय ग्रंथ पारायण, त्यानंतर गाथा भजन तर दुपारी १ ते ५ यावेळेत श्री. भागवत कथा होणार आहे. तर सायंकाळी हरिपाठ व रात्री ९ ते ११ यावेळेत हरिकिर्तन व त्यानंतर हरीजागर होणार आहे. तत्पूर्वी भागवत पुजन व समाप्ती महाआरती सौ. व श्री. सिमा शामराव भांदरगे यांच्या हस्ते होणार आहे. तर प्रगट दिनाचा महाप्रसादाचे मुख्य यजमान सौ. व श्री. सरिता दत्तात्रय शेजुळ हे राहणार असून भजनी मंडळ आणि किर्तन सेवेस साथ देणार आहेत मृदंगाचार्य हभप भगवान म. जाधव व तुकाराम म. मुढे, गायनाचार्य हभप हभप विष्णू म. सावंत हे ज्ञानेश्वर म. जोशी, भगवान म. लकडे, गिरी महाराज, रमेश प. पवार, यादव म. जाधव, उध्दव म. राठोड तर हरिपाठाचे नेतृत्व हभप विष्णू म. सावंत हे करणार आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. गजानन महाराज विश्वस्त मंडळाचे सचिव श्री. सपंतराव पाटील व समस्त विश्वस्तांनी केले आहे.



**जालना महापालिका हद्दीमधील अण्णा भाऊ साठे स्मारक ते मुक्तेश्वर प्रवेशद्वारपर्यंतच्या मुख्य रस्त्याचे बांधकाम सुरू आहे. या कामाची आज दिनांक ९ फेब्रुवारी २०२५ रोजी आमदार अर्जुनरावजी खोतकर यांनी पाहाणी केली व उत्कृष्ट दर्जाचे काम व्हावे म्हणून सूचना केल्या. याप्रसंगी शिवसेना संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, अशोक पांगारकर यांची उपस्थिती होती.**

# दिल्लीला भाजपची सत्ता; मंठ्यात भाजप कडून जल्लोष



**मंठा । प्रतिनिधी -** दिल्ली राज्यात भारतीय जनता पार्टीची निर्विवाद सत्ता आल्याने मंठा तालुका भारतीय जनता पार्टीच्या वतीने फटाके वाजवून आनंद साजरा करण्यात आला

मंठा येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मा .मंत्री आ. बबनराव लोणीकर व प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वात भारतीय जनता पार्टीचे सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने देशाची राजधानी दिल्लीमध्ये भारतीय जनता पार्टीची निर्विवाद सत्ता आल्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या सर्व कार्यकर्त्यांमध्ये जोषांचे वातावरण होते भारतीय जनता पार्टीचा विजय असो, देश का नेता कैसा हो, नरेंद्र मोदी जैसा हो, अशा घोषणा देऊन फटाके फोडून आनंद साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टी मंठाचेतालुकाध्यक्ष सतीश निर्वळ, किसान मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष राजेश मोरे, पंजाबराव बोराडे, नगरसेवक नारायण दवणे, नगरसेवक मुस्तफा पठाण, सरपंच राजभाऊ खराबे सरपंच गणेश चव्हाण, तानाजी शेंडगे, शिरु खरात प्रसाद वाघमारे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांचा राजीनामा

**नवी दिल्ली -** मणिपूरचे मुख्यमंत्री एन. बिरेन सिंह यांनी आज आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी राजभवनात जाऊन राज्यपाल अजय कुमार भल्ला यांची भेट घेतली आणि मुख्यमंत्री पदाचा आपला राजीनामा दिला. आजच सिंह यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली होती. गेल्या अनेक दिवसांपासून राज्यात सुरू असलेल्या हिंसाचाराच्या मुद्द्यावर विरोधकांकडून त्यांच्यावर टीका केली जात होती. तसेच सूत्रांच्या माहितीनुसार १२ आमदारही नेतृत्व बदलासाठी दबाव टाकत होते.

# प्रशिक्षणातून उभारला स्वयंरोजगार

**जालना । प्रतिनिधी -** इनरव्हील क्लब ऑफ जालना सेंट्रल च्या माध्यमातून सिंधी काळेगाव येथील महिलेला ब्युटी पार्लर सुरू करून स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात आला.

सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाच्या वतीने गेल्या दोन वर्षापासून जालना शहर व ग्रामीण भागातील गरजू विद्यार्थी, विद्यार्थिनी व महिलांसाठी टेलरिंग, ब्युटी पार्लर, फूड टेक, एम एस ऑफिस, टॅली, डीटीपी कोर्सचे कौशल्य प्रशिक्षण दिले जाते व या प्रशिक्षित महिलांना व्यवसायास प्रोत्साहन व आवश्यक मदत केली जाते. संस्थेच्या माध्यमातून ब्युटी पार्लर प्रशिक्षण पूर्ण केलेल्या सिंधी काळेगाव येथील सोनाली मुळे यांना स्वयं रोजगारास प्रोत्साहन म्हणून इनरव्हील क्लब ऑफ जालना सेंट्रल च्या माध्यमातून ब्युटी पार्लर सुरू करून स्वयरोजगार उपलब्ध करून देण्यात




आला. यावेळी इनरव्हील क्लब जालना सेंट्रलच्या शिल्पा कावणा यांनी आपण अतिशय चांगल्या प्रकारे प्रशिक्षण घेऊन हा व्यवसाय सुरू केला आहे हे ग्रामीण भागाच्या दृष्टीने अभिनंदन आहे. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळाचे विश्वस्त राजेंद्र जी राठी यांनी हा व्यवसाय असाच वृद्धिंगित होत जावा व आपण देखील गरीब, गरजू विद्यार्थिनींना मदत करून स्वतःच्या पायावर उभे करण्यास प्रोत्साहन द्यावे असे सांगितले. यावेळी यशवंत बदनापूरकर यांनी संस्थेच्या विविध प्रकल्पाविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भानुदास दोबाले यांनी केले तर आभार प्रदर्शन मंगला भुरेवाल यांनी मानले. यावेळी दुर्गा यगेवार, निशा मारवाणी, रेवती वाघमारे, आरती पवार, अश्विनी नाईकवाडे, व गावकरी उपस्थित होते.

# मनरेगा योजनेत मजुरांच्या नावाने बोगस बीले उचलल्याची तक्रार

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा सरपंच, ग्रामसेवक व ग्रामरोजगार सेवक यांनी मनरेगा योजनेतील सिंचन विहिरीचे काम मशीनच्या साह्याने करून मजुरांच्या नावाने बोगस मस्टर काढून बिले उचलले असल्याचीग्रामस्थ वैभव जाधव यांनी गटविकास अधिकाऱ्याकडे केली आहे. की, माळकिनी ग्रा. पं. अंतर्गत मग्ररोह योजनाचे सिंचन विहरीचे कामे गावात चालू आहेत.

सदरील कामे हे ६०: ४० प्रमाणे करणे आवश्यक आहेत परंतू त्या प्रमाणे काम न करता सदरील कामे हे मशिनच्या साह्याने करीत आहेत आणि जे मजुर बाहेरगावी गेले आहे त्यांच्या नावाने मस्टर भरणा करुन बिले काढण्याचे काम सदरील यंत्रणा करीत आहे. तसेच गावात याच योजना अंर्गत वृक्ष लागवड चे काम दाखविले आहे परंतू गावात एकही झाड या लोकांनी लावले नाही. या कामाचे चक्क बनावट व खोटे रेकॉर्ड तयार करुन लाखो रुपयाचे-बिल उचलण्यात आले आहे.

सदरील बाबत संबधीत यंत्रणा यांना विचारणा केली असता तुला काय करायचे आहे आम्हला या कामात साहेबांना पैसे द्यावे लागतात त्यामुळे हे कामे अशची करावी लागातात. त्याम ुळे तु आमच्या कामात लक्ष देवून नकोस आम्हाला सर्वाना हप्ते द्यावे लागतात ग्रा.पं.. चे काम असेच असते.

मस्टरमध्ये नमुद केलेले मजुर हे अतिशय वयोगध्द आहेत तर काही मजुर हे बाहेरगावी गेलेले आहे वृध्द मजुर हे श्रावण बाळ योजनेतील लाभार्थी आहेत त्यानुार त्यांचे वय ७० वर्ष च्या पुढे किंवा जवळपास आहे आणि त्यांचे नावे या मस्टरवर नमुद केली आहेत या बाबत आपण शहानिशा केल्यास सत्यता आपल्या निदर्शणास येईल.

या विषयी स्वतः लक्ष घालून प्रकरणाची सखोल चौकशी करुन सदरील कामे नियमाप्रमाणे पूर्ण होत नाही, तोपर्यंत सदरील कामाचे देयक देण्यात येवू नये, नसता आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा ईशारा देण्यात आला आहे. निवेदनावर वैभव जाधव यांची स्वाक्षरी आहे.

# ग्रंथालय असोसिएशनचे पुरस्कार जाहीर

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा ग्रंथालय असोसिएशन तर्फे सार्वजनिक ग्रंथालय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांना उत्कृष्ट ग्रंथालय, उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता ,उत्कृष्ट ग्रंथालय कर्मचारी पुरस्कार निवड समितीने जाहीर केले आहे. वर्ष २०२४-२५ साठी शंकरराव बालेकर स्मृति उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार बदनापूर येथील स्वामी विवेकानंद वाचनालय, भगवानराव देशपांडे स्मृति उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार मंठा येथील सम्राट अशोक वाचनालयाचे अध्यक्ष अरुण प्रधान, अण्णासाहेब चव्हाण स्मृति उत्कृष्ट ग्रंथालय कर्मचारी घनसावंगी तालुक्यातील कुंभार पिंपळगांव येथील समर्थ सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल हिम्मत सोळंके यांना जाहीर झाला आहे. शाल,श्रीफळ,रोख रक्कम,स्मृति चिन्ह,सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

# बहुजनाच्या उत्कर्षाचा मार्ग हा शाळा, कॉलेजमधून जातो - ॲड. वैशाली डोळस

## त्यागमुर्ती माता रमाईचे योगदान आणि बहुजन युवती पुढील आव्हाने या विषयावर प्रतिपादन

**मंठा । प्रतिनिधी -** महाराष्ट्रातील परिवर्तनवादी चळवळीतील सक्रीय कार्यकत्या ड वैशालीताई डोळस मंठा येथे माता रमाई यांच्या १२७ व्या जयंती निमित्ताने व्याख्यान प्रसंगी बोलताना म्हणाल्या की, रमाईने किती त्याग केला, माता सावित्रीने स्त्री शिक्षणासाठी त्याग केला, मॉ जिजाऊ तर महाराष्ट्रासाठी आदर्श त्याच्याशी आपण प्रामाणिक आहोत का ? सरकार किती काम करत आहे बस म ध्ये महिलाना अर्ध टिकीट, वयस्कांना फ्री बस ,लाडक्या बहिनिला १५०० हजार रूपये आणि सरकारी खात्यात नौकऱ्या बंद, शाळा बंद काय भिक माघायचे का आम्हाला. या देशाचा ईतिहास स्त्रीयांनी राज्य केले आहे. अहिलाबाई होळकर, राष्ट्र माता जिजाऊ, तारा राणीने औरंगजेबाला याच मातीत गाडले आणि या जिजाऊच्या सावित्री च्या अहिल्याच्या वारसदार स्त्रीया १५०० हजार रूपाया साठी रांगेत आरे द्यायचं असेल ना तर आम्हाला प्राथमिक शिक्षण सक्तीच आणि मोफत द्या जे डॉ बाबासाहेबांनी सविधानाच्या डायरेक्टीव्ह प्रिंन्सीपल मध्ये या देशातील सर्व मुला-मुलीनां वय १ वर्ष ते १४ पर्यंत मोफत शिक्षण सक्तीच दिलं पाहिजे. सविधानांच्या २३ अ मध्ये तुम्हाला शिक्षणाचा अधिकार दिला आहे. आज आमच्या मराठी शाळा बंद होत आहेत खाजगी शाळेची फि, केजी ५0000 हजार रूपये मग गरीबांची मुळे शिकणास कशी जि लोक ती फिस भरू शकत नाही. ते शेतकरी, मजुर कष्टकरी, कामगार, मध्यम वर्गीय समाज यांची मुले मुली सरकारी शाळेत जातात देशभरा मध्ये जेवंढे ऑफीसर, प्राध्यापक ते सर्वच सरकारी शाळेतील आहेत. सरकारी शाळेचं शिक्षण कमी दर्जाचं असतं की, काय? पण आज सरकारी मात्र बहुजन समाज वर्गातील लोकांना शिक्षण नाकारण्यासाठी सरकारी शाळा बंद करतानी हे सरकार दिसतंय आणि म्हणुन शाळा जर बंद झाल्या तर शिक्षण कोणाच नाकारल जातं तर मुलीचे हा प्रश्न आहे.तुमच्या माझ्या समोरचा. यावेळी मंचावर नगराध्यक्षा सौ वंदना वैजनाथ बोराडे, प्रा.मिनाक्षी आठवले, प्रा. मनिषा गायकवाड, नगरसेविका छाया अरूण वाघमारे, यमुना शेषनारायण दवणे, कविता इंगळे, यांची उपस्थिती होती.



पुढे बोलताना ॲड वैशाली डोळस म्हणाल्या की, इंग्रजी शाळा मुलाला मराठी शाळा मुलीला जमीनी नावावर करयच्या मुलांच्या मुलीला दुसाया घरी पाठवून देयचं आणि अमच्या मुली त्याच्यात खुश चांगल्या साड्या, दांगीने आम्ही खुश हे वैभव आहे तुमच हे जगन आहे का तुमचं रमाई ने अमच्या हेसाठी जो त्याग केला आणि बाबासाहेबांना शिकू दिलं म्हणुन आज आपली प्रगती आहे. टि. व्ही मुळे अमच्या महिला बिघडल्या पण टिव्हीत माळेके प्रमाणे नवरा बदलतो टीव्ही आणि मोबाईल पासून दूर होऊन. आंदोलन करण्यासाठी चळवळ करण्यासाठी आपण सज्ज होऊया. ए नादान हुक्मरानो इमान पर चलो. बुवा बापू छोडकर विज्ञान प्रचलो एक दिन अमेरिका से भी आगे होगा भारत चलना है तो डॉ बाबासाहेब आंबेडकर के संविधान पर चलो असे म्हणत आम्हाला संविधानावरच चालायचे आमच्यासाठी संविधान हे पवित्र पुस्तक नसून संविधान आमच्यासाठी जीव की प्राण आहे आणि म्हणून संविधान वाचायचे आणि वाचवायचं अशा डोळस म्हणाल्या. यावेळी प्राध्यापक धोंडोपंत मानवतकर बाळासाहेब आंबेरे प्राध्यापक सोनाजी कामेठे, रंगनाथ बापू वाटाणे नगरसेवक राजेश खंदारे अरुण वाघमारे प्रा डॉ राजेश गायकवाड, प्रा.आर एस गायकवाड, ड सिद्धार्थ अवसरमोल, संजय वाघम ारे, प्रकाश वाव्हळे,ड सुमेध आवारे,बी के प्रधान मारुती खनपटे, अशोक आवचार,किरण आवचार,गंगाराम गवळी शरद मोरे भीमराव वाघ राजेश खनपटे गणेश वाघमारे यांची उपस्थिती होती सूत्रसंचालन मीना खंदारे यांनी केले तर आभार छाया वाघमारे यांनी व्यक्त केले रमाई जयंती करिता महिलांचा सहभाग बहुसंख्येने होता. रमाई जयंती उत्सव समितीचे सौरभ मोरे विजय गोंडगे संगती वाघम ारे करण वटाणे, सनी जाधव संदीप प्रधान अनिकेत देशमाने शुभम वाघम ारे यश जाधव सुयश जाधव विजय वाघमारे अक्षय वाघमारे परिश्रम घेण्यात आले 'रमाई' ग्रंथांचे वाटप नगरसेविका छाया अरूण वाघमारे यांच्या वतीने वाटप करण्यात आले सायंकाळी भव्य मिरवणूक काढण्यात आली.

## मंठा- उस्वद रोडवरील साईडपट्ट्या न भरल्याने अपघात होण्याची शक्यता!

**मंठा । प्रतिनिधी** - उस्वद रोडच्या अंदाजे ५०० मिटर ते १ किमी अंदाजीत अंतरापर्यंत सिमेंट रोडच्या साईडपट्टया भरल्या नसल्यामुळे अपघाताची दाट शक्यता निर्माण झाली आहे. संबंधित विभागाचे अधिकारी यांच्या नियोजनशून्य कारभारामुळे वाहन चालकांना आपला जीव धोक्यात घालून वाहने चालवीताना कामालीची कसरत करावी लागते.

मंठा ऊस्वद देवठाणा, शेगाव पंढरपूर दिंडी मार्ग हा रोड तळणी शेगांव पंढरपूर या रोडला मिळत आहे हा सीमेट रस्त्याचे काम झाले आहे. सदर मार्ग हा मंठा शहरातील तुकाराम नगर मधुण जात असल्याने सिमेंट रस्ता झाला आहे. तुकाराम महाराज मंदिर. तहसील कार्यालय कस्तुरबा गांधी मुलीचे वस्तीगृह जगदंबा देवी मंदिर स्थळ असल्याने या मार्गे पर्यटकांची नेहमीच वर्दळ असते. रस्ता अरुंद असल्यामुळे समोरून येणारे चार चाकी वाहन चूकविण्यासाठी मोटर सायकल रस्त्याच्या बाजूला - घालावी लागते. साईडपट्टया न भरल्याने दोन-तीन फुटापर्यंत खड्डे दोन्ही साईडला पडले आहे. परिणामी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. या अगोदर अपघाताच्या किरकोळ घटना घडलेल्या आहे. संबंधित विभागाने याकडे मात्र डोळेझाक करताना दिसून येत आहे. एखाद्या मोठा अपघात होऊन एखाद्याचे प्राण गेल्यावरच संबंधित विभागाला जाग येईल का? असा प्रश्न सामान्य नागरिकांना पडला आहे. स्वतःहाच्या टक्केवारीसाठी ठेकेदाराला पाठीशी घालणाऱ्या संबंधित विभागाचे अधिकारी निरअपराध नागरिकांचे बळी घेणार का? तरी वरिष्ठ स्तरावरून लक्ष घालून साईड पट्ट्या भरून भविष्यात होणारे अपघात टाळणे गरजेचे आहे.



## कोणी सोडून गेल्याने शिवसेना संपणार नाही - खा. संजय जाधव

### छ.शिवाजी महाराज जयंती निमित्त मंठ्यात प्रदीप बोराडे चषकाचे उदघाटन

**मंठा । प्रतिनिधी** - स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराने प्रेरित होऊन चालनारा बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्ष हा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवा नेतृत्व आदित्य ठाकरे यांनी मागील काही वर्षात अनेक चढउतार पाहिले असून पक्ष सोडून जनारांची काय अवस्था होत आहे ते आपण आज राज्याच्या राजकारणात पाहत आहोतच त्या मुळे पक्षातून कोणी गेल्याने शिवसेना संपणार नाही.असे प्रखर मत खा.संजय उर्फ बंडू जाधव यांनी मांडले ते छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त नगरसेवक प्रदीप बोराडे आयोजित टेनिस बॉल क्रिकेट चषकाच्या

उद्घाटन प्रसंगी मंठा येथे(ता.८) शनिवार रोजी बोलत होते. या वेळी व्यासीठावर विश्वनाथआप्पा बोराडे, कयूम कुरेशी, शिराज खा पठाण, मुसाभाई कुरेशी, शबाब कुरेशी, ज्ञानेश्वर सरकटे, संजय नागरे, आबासाहेब कदम, आसाराम बोराडे, कबीर तांबोळी, बाळू बोराडे, शेख एजाज, गणेशराव शहाणे, दत्तराव हातकडके, श्याम टाके, राहुल वानखेडे, निलेश जोजारे, गणेश गणगे, सचिन चव्हाळ, कृष्णा हेलसर यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात मंठा टी पॉईंट ते देवी रोड वरील क्रिकेट मैदाना पर्यंत मोटर सायकल रॅली काढण्यात आली. सुरुवातीस छत्रपती शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पुढे बोलतांना खा.जाधव म्हणाले की,खरा शिवसैनिक हा लढाया असून पक्षावर कितीही हल्ले झाले तरी शिवसेना पक्ष मजबूत असल्याचे कारण म्हणजे स्व. बाळासाहेबचे विचार आहेत.बाळासाहेबांचे




विचाराचे पालन करणाराच खरा शिवसैनिक असतो.त्या मुळे शिवसेनेनेच मोठे केलेले तालुक्यातील काही सैनिकानी शिवसेना सोडून स्वतःच्या स्वार्थासाठी इतर पक्षांशी घरोबा केला आहे.पण अश्या कोणी स्वार्थी लोकांनी पक्ष सोडला म्हणून शिवसेना थांबणार नाही तर उलट शिवसैनिक नव्या उमेदीने कामाला लागेल या साठी आपण नगरसेवक प्रदीप बोराडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून भविष्यात प्रदीप बोराडे यांना सर्वतोपरी सहकार्य केले जाईल असा विश्वास त्यांनी बोलतांना शेवटी दिला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी संजय बोराडे,रवी काळे, राहुल बोराडे, इम्रान पठाण,सचिन चव्हाळ,शेख इलू, जुनेद पठाण,शेख रियाज, शेख जब्बार, रामेश्वर बोराडे, शंकर कचरे यांनी परिश्रम घेतले तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश गणगे यांनी केले.

**मंठा तालुक्यातील शिवसेनेचा किल्ला अभेद ठेवणार - प्रदीप बोराडे**

हिंदुत्वासाठी रस्त्यावर उतरणाऱ्या शिवसैनिकांना स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर अनेकांनी लचके तोडण्याचा प्रयत्न केला. परंतु कडवा शिवसेनिक कधीच कोणासमोर झुकत नसतो. हे मंठा तालुक्यातील शिवसैनिकांनी मागील तीस वर्षापासून सातत्याने दाखवून दिले आहे. त्यामुळे मंठा तालुक्यातील शिवसेनेचा बालेकिल्ला अभेद्य ठेवण्यासाठी अहो रात्र प्रयत्न करणार असल्याचे नगरसेवक प्रदीप बोराडे यांनी सांगितले.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.